खडक पोलीस स्टेशन पुणे
दिनांक – ०१/०१/२०१८

प्रेसनोट

--------------

**मध्यवस्तीत घरफोडी चोरी करणारा सराईत जेरबंद, तीन अल्पवयीन मुलांनी केली घरफोडी चोरी घरफोडीचे चार गुन्हे उघड तीस ग्रॅम सोने व एकशे साठ ग्रॅम चांदीचे दागिण्यासह एक लाखाचा ऐवज हस्तगत**

सौ. कविता लक्ष्मण रासगे वय-३५ रा – ५५३ मेमजादे अपार्टमेंट भवानी पेठ पुणे यांनी घटनेबाबत खडक पोलीस स्टेशन पुणे येथे तक्रार दिलेले आहे त्यांचे व सदर ठिकाणी राहणारे रहिवाशी यांचे घराचे दरवाजा व खिडकी उघडी असताना अज्ञात चोरटयाने दिनांक – २७/१०/२०१७ रोजी पहाटे ०२/३० ते सकाळी ०७/०० वा चे दरम्यान घरात प्रवेश करुन व खिडकीतुन आत हात घालुन सोन्याचे दागिने, मोबाईल फोन, रोख रक्कम असा एकुण ४७,२००/- रु चा माल चोरुन नेला होता. त्याचप्रमाणे श्री अजय हरिसिंग परदेशी वय-३८ रा – एकवचन मित्र मंडळ जवळ कासेवाडी पुणे यांचे घर बंद असताना दिनांक–०७/१२/२०१७ ते १७/१२/२०१७ या दहा दिवसाच्या कालावधीमध्ये कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराच्या दरवाज्याचे कुलुप तोडुन घरात प्रवेश करुन घरातील ६३,२००/- रु चे सोन्या चांदीचे दागिने घरफोडी चोरुन करुन नेले होत त्याबाबत त्यांनी पोलीसांकडे तक्रार दिलेली आहे.

खडक पोलीस स्टेशन पुणे येथील अधिकारी व कर्मचारी गुन्हयाचा तपास करत असताना पोलीस कर्मचारी अशिष चव्हाण यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की सदर गुन्हा पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार विनायक बंडु कराळे रा - भगवा चौक कासेवाडी भवानी पेठ पुणे याने केलेला आहे व तो त्याचे नातेवाईकांकडे मुपोता - मोहोळ जिल्हा - सोलापुर याठिकाणी राहत आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्यानंतर पोलीसांनी मोहोळ येथे जावुन सापळा लावुन दिनांक – २६/१२/२०१७ रोजी त्यास ताब्यात घेतले आहे. त्याचेकडे बारकाईने सखोल तपास केला असता त्याने व त्याचा अल्पवयीन साथीदारासह गुन्हा केल्याचे कबुल केले आहे त्याचे ताब्यातुन गुन्हयातील **चोरीस गेलेल्या मालापैकी एकोणतीस हजार रुपयेचा माल दहा ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र मोबाईल फोन व गॅस सिलेंडर हस्तगत करण्यात आलेला आहे त्याचेकडुन घरफोडी चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आलेले आहेत.**

**आरोपी पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे त्यास सन २०१५ साला मध्ये पुणे शहर व पुणे जिल्हयातुन दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आले होते. त्याचेविरुध्द यापुर्वी घरफोडी चोरीचे सात व दंगा मारामारी चा एक व तडीपार आदेशाचा भंग केल्या प्रकरणी दोन असे एकुण नऊ गुन्हे दाखल आहेत. आरोपीने अशाप्रकारे घरफोडी व इतर चोरीचे आणखी गुन्हे केले आहेत काय ? त्याचे कोणी साथीदार आहेत काय ? याबाबत पोलीस तपास करत आहेत.**

मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सहावे न्यायालय पुणे यांचे न्यायालयात आरोपीस हजर केले असता त्यास दिनांक – ०३/०१/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत. दरम्यान पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीनुसार तीन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आले आहे त्यांनी कासेवाडी भवानी पेठ पुणे याठिकाणी राहणारे अजय हरिसिंग परदेशी यांचे घर फोडल्याचे कबुल केले आहे त्यांचे ताब्यातुन गुन्हयातील चोरीस गेलेला माल २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे व १६० वजनाचे चांदीचे दागिने असा एकुण चौसष्ठ हजार रुपये किंमतीचा माल हस्तगत करण्यात आलेला आहे व अल्पवयीन मुलांना बाल सुधार गृहामध्ये पाठविण्यात आलेले आहे यापुर्वीही त्यांचेविरुध्द वाहन चोरी, घरफोडी चोरी, जबरी चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

दिनांक – ३१/१२/२०१७ रोजी पोशि अशिष चव्हाण यांना मिळालेल्या बातमीवरुन पुणे शहर आयुक्तालय व पुणे जिल्हयातुन दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आलेला **नामचीन गुन्हेगार स्वप्निल सुनिल हराडे वय – २२ रा – ८९ घोरपडे पेठ कानिफनाथ हॉटेल जवळ पुणे यास घातक शस्त्रासह लोहीयानगर भवानी पेठ पुणे या भागात सापळा रचुन पकडण्यात आलेले आहे.** त्याचेकडे सखोल तपास केला असता तो सहकार नगर पोलीस स्टेशन पुणे येथील जबरी चोरीच्या गुन्हयामध्ये फरार व अलंकार पोलीस स्टेशन पुणे येथील जबरी चोरीच्या गुन्हयातील संशयीत असल्याचे निष्पन्न झाले आहे त्याचेविरुध्द **यापुर्वी खडक, पिंपरी. चिंचवड, सहकार नगर या पोलीस स्टेशनला जबरी चोरीचे तीन, दंगा मारामारीचे तीन, चोरी एक , हत्यार जवळ बाळगणे एक असे एकुण आठ गुन्हे दाखल आहेत.**

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. बसवराज तेली, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. किशोर नाईक यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री संभाजी शिर्के, तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड, अनंता व्यवहारे व तपास पथकातील कर्मचारी प्रकाश टोपे, विजु कांबळे, सर्फराज शेख, बशीर सैय्यद, विश्वनाथ शिंदे, विनोद जाधव, गणेश माळी, इम्रान नदाफ, अनिकेत बाबर, अशिष चव्हाण, रवि लोखंडे, महेश कांबळे, महेश बारवकर [illegible] यांनी केलेली आहे.